CAMBRIDGE
International Education

# Cambridge O Level

| | |
|---|---|
| CANDIDATE NAME | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| CENTRE NUMBER | | | | | | CANDIDATE NUMBER | | | | | |

*0123456789*

**MARATHI** **3218/02**

Paper 2 Reading and Translation **For examination from 2028**

SPECIMEN PAPER **1 hour 45 minutes**

You must answer on the question paper.

No additional materials are needed.

**INSTRUCTIONS**
- Answer **all** questions.
- Use a black or dark blue pen.
- Write your name, centre number and candidate number in the boxes at the top of the page.
- Write your answer to each question in the space provided.
- Do **not** use an erasable pen. Do **not** use correction fluid or tape.
- Do **not** write on any bar codes.

**INFORMATION**
- The total mark for this paper is 50.
- The number of marks for each question or part question is shown in brackets [ ].

| For Examiner's Use | |
|---|---|
| 1 | |
| 2 | |
| 3 | |
| 4 | |
| 5 | |
| Total | |

This document has **12** pages. Any blank pages are indicated.

© Cambridge University Press & Assessment 2028



v1

**1** Read the text. For each question, tick (✓) the box to show the correct answer.

माझ्याकडे बातमी आहे. आम्ही एक नवीन घर खरेदी करण्याचे ठरविले आहे. आता फक्त मी माझ्या पालकांसोबत राहते, कारण माझा भाऊ पन्नास किलोमीटर अंतरावर, राजधानीत कामावर गेला आहे. मध्यावर असलेल्या आमच्या फ्लॅटमधल्या काही खोल्यांची आता आम्हाला गरज नाही. त्यामुळे आम्ही शहराबाहेर एक लहान घर शोधत आहोत. आई म्हणते की नवीन घरात गॅरेज आणि एक लहान बाग असावी.
आम्हाला बाहेर गवतावर बसण्यासाठी जागा हवी आहे आणि शिवाय, मी मांजर पाळू शकेन, जे फक्त बाल्कनी असलेल्या फ्लॅटमध्ये कठीण आहे. माझ्या आई-वडिलांना माझ्या आजीच्या जवळ राहायची इच्छा आहे- तिला कधीकधी मदतीची आवश्यकता असते. ती ऐंशीहून अधिक वर्षांची आहे. काल मी आईसोबत एक घर पाहण्यासाठी गेले होते, जे तिला वर्तमानपत्रात सापडले होते. मला ते खरोखर छान वाटले, आई म्हणाली तो रस्ता खूप रहदारीचा आहे, जरी नुकतेच नवीन नूतनीकरण केलेले बाथरूम तिला खूप आवडले होते

लुसिआ

**(a)** लुसिआचा भाऊ राहतो ...

**A** त्यांच्या पालकांच्या घरात. ☐

**B** दुसऱ्या शहरात. ☐

**C** परदेशात. ☐

[1]

**(b)** लुसिआ आता राहत असलेला फ्लॅट ...

**A** कुटुंबासाठी खूप मोठा आहे. ☐

**B** कधीकधी खूप गोंगाटाचा असतो. ☐

**C** केंद्रापासून खूप दूर आहे. ☐

[1]

**(c)** लुसिआच्या आईला असे घर हवे आहे जिथे ती ...

**A** काम घरून करू शकेल. ☐

**B** वाहन लावू शकेल ☐

**C** बागेत भाज्या पिकवेल. ☐

[1]

**(d)** लुसिआ काय करु शकेल ...

**A** बागेतील गवत कापू शकेल. ☐

**B** बाहेर बागेत आराम करु शकेल. ☐

**C** बागेत खेळु शकेल. ☐

[1]

**(e)** नवीन घरात, लुसिआला आशा आहे की एक ...

**A** मांजर असेल. ☐

**B** बाल्कनी असेल. ☐

**C** अभ्यासाची जागा असेल. ☐

[1]

**(f)** लुसिआची आजी ...

**A** तिच्या पालकांना मदत करते. ☐

**B** बागकाम आवडीने करते. ☐

**C** बरीच म्हातारी आहे. ☐

[1]

**(g)** त्यांनी काल पाहिलेले घर कोणाला सापडले?

**A** लुसिआची आजी. ☐

**B** लुसिआची मम्मा. ☐

**C** लुसिआचे वडील. ☐

[1]

© Cambridge University Press & Assessment 2025

**(h)** लुसियाच्या आईच्या मते, त्यांनी पाहिलेले घर ...

**A** खूप गोंगाटात होते. ☐

**B** त्याला दुरुस्तीची गरज होती. ☐

**C** महाग होते. ☐

[1]

[एकूण: 8]

© Cambridge University Press & Assessment 2025 

Turn over

© Cambridge University Press & Assessment 2025

**2** Read the text. Answer the following questions in **Marathi**.

तुम्हाला व्यावसायिक क्रीडा छायाचित्रकार व्हायला आवडेल का? हे काम सर्वांनाच आवडेल, पण ते करणारे लोक म्हणतात की ते खरोखर कठीण आहे. अर्थात, या कामामुळे तुम्हाला जगभर प्रवास करण्याची आणि मोठ्या क्रीडा प्रसंगाला जाण्याची संधी मिळते. परंतु सतत प्रवास केल्यामुळे हे काम थकवा देखील आणते. तुमचे फोटो खरेदी करणाऱ्या कंपन्या प्रत्येक वेळी एका उत्कृष्ट परिपूर्ण फोटोची अपेक्षा करतात.

एखाद्या महत्त्वाच्या सामन्यात क्रीडा छायाचित्रकारांमध्ये खूपच जोरदार स्पर्धा असते. परंतु, एकदा ते स्टेडियम सोडलं की मात्र ते सर्व एकमेकांचे मित्रच होतात आणि एकमेकांना आधार देतात. या क्रीडा छायाचित्रणात प्रवेश करणे कठीण असू शकते. बहुतेक मोठ्या क्रीडा स्पर्धांमध्ये, केवळ प्रसिद्ध छायाचित्रकारांनाच आयोजकांकडून सहज प्रवेश तिकीट मिळू शकते. याचा अर्थ असा नाही की इतरांना संधी मिळत नाही – नवीन आलेल्यांना फक्त चिकाटी आणि भाग्य असणे आवश्यक आहे.

सुरुवातीला, क्रीडा छायाचित्रकार संधी येईपर्यंत खूप कमी पैसे कमवतात. एके दिवशी तुम्ही योग्य वेळी, योग्य ठिकाणी राहून जर एक उत्कृष्ट फोटो काढला तर तो वर्षानुवर्षे विकला जाईल. त्यामुळे एक छायाचित्रकार म्हणून तुमची प्रतिष्ठा होईल.

**(a)** व्यावसायिक क्रीडा छायाचित्रकार त्यांच्या कामाबद्दल काय विचार करतात?

............................................................................................................................ [1]

**(b)** लेखकाने क्रीडा छायाचित्रकाराच्या भूमिके बद्दल कोणत्या चांगल्या गोष्टींचा उल्लेख केला आहे? **दोन** तपशील द्या.

1 ............................................................................................................................

2 ............................................................................................................................

[2]

**(c)** लेखकाने प्रवास करण्याचा कोणता तोटा नमूद केला आहे?

............................................................................................................................ [1]

**(d)** छायाचित्रकारांकडून संस्था काय अपेक्षा करतात?

............................................................................................................................ [1]

**(e)** छायाचित्रकार एकमेकांशी कसे वागतात:

**(i)** महत्त्वाच्या सामन्याच्या दरम्यान?

............................................................................................................................ [1]

**(ii)** महत्त्वाच्या सामन्यानंतर?

............................................................................................................................ [1]

**(f)** मोठ्या क्रीडा स्पर्धांमध्ये प्रसिद्ध छायाचित्रकारांना काय फायदा होतो?

............................................................................................................................................ [1]

**(g)** नव्या छायाचित्रकारांनी यशस्वी होण्यासाठी काय करावे?

............................................................................................................................................ [1]

**(h)** क्रीडा छायाचित्रकार म्हणून सुरुवात करताना तुम्ही किती कमाईची अपेक्षा करु शकता?

............................................................................................................................................ [1]

**(i)** उत्कृष्ट छायाचित्र काढण्याचे **दोन** फायदे लिहा.

1 ............................................................................................................................................

2 ............................................................................................................................................

[2]

[एकूण: 12]

Read the following text and then answer **Question 3** and **Question 4** in **Marathi**.

**बक्षीस समारंभ**

मी अजूनही शाळेत नोकरी स्वीकारण्याचा निर्णय घेतला नव्हता. पण मुख्याध्यापकांनी हॉटेलवर फोन करून बक्षीस समारंभासाठी मला वैयक्तिकरित्या आमंत्रित केले. त्यानंतर, मी नाही कसे म्हणू शकलो असतो ? जेव्हा मी पोहोचलो तेव्हा विद्यार्थी आधीच तिथे उपस्थित होते. या महत्त्वाच्या प्रसंगावेळी ते शांत आणि नम्रपणे, सर्वोत्तम कपडे घालून शाळेच्या हॉलबाहेर वाट पाहत होते. त्यांचे पालक त्यांना अभिमानाने पाहत होते.

बक्षीस वितरण समारंभाची सुरुवात एका उंच, आनंदी - ,संगीत शिक्षिकेने, पियानोवर वाजवलेल्या शाळेच्या गाण्याने झाली. ते एक सुंदर गाणे होते आणि मुलांनी ते आनंदाने गायले. त्यानंतर राष्ट्रगीत झाले आणि मुले ध्वजाकडे पाहत सरळ उभी राहिली. त्यांनी हात हृदयावर ठेवून, डोळ्यात अश्रू आणून उत्साहाने गायले होते, आणि ते सर्व प्रभावी होते. परंतु, संगीत शिक्षिकेने पियानो खूप मोठ्याने वाजवला आणि मुलांचे गाणे ऐकणे कठीण झाले. तरीही, खोलीतील प्रतिष्ठा आणि अभिमान इतका स्पष्ट होता की मला देखील मी गर्वाने ताठ उंच उभे असल्याचे जाणवले.

संगीत संपल्यावर, मोठ्या मुलांनी वर्षभरात झालेल्या विविध उपक्रमांबद्दल सांगितले. त्यात पर्यावरणदिन उत्सव, फुटबॉल स्पर्धा, संगीत मैफिली, कला मंडळ, पोहण्याच्या स्पर्धा आणि शैक्षणिक भेटींचा समावेश होता. शिक्षक किती मेहनती होते, हे पाहून मला आश्चर्य वाटले. त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी हे सर्व उपक्रम आयोजित केले होते.

नंतर बक्षीस वितरण : प्रत्येक वर्गातील सर्वोत्तम विद्यार्थी उभे राहिले आणि त्यांना एक छोटे पुस्तक मिळाले. शेवटी, मुख्याध्यापकांनी सर्वांना सुट्टीसाठी शुभेच्छा दिल्या.

“अरे हा , आणखी एक खास गोष्ट! मी श्री. बिहारी यांची ओळख करुन देतो. ते आपल्या सोबत राहण्यासाठी दूरहून फ्रान्सहून आले आहेत. आम्हाला खरोखर आशा आहे की ते पुढच्या सत्रात आमच्यात सामील होतील.” सर्वांच्या नजरा माझ्याकडे वळल्या. “मुलांनो, जर श्री. बिहारी पुढच्या सत्रात आपल्यात सामील होऊन आपल्या शाळेत मदत करु शकले तर ते छान होईल ना?” लगेच, सर्व मुले आणि पालक जोरात टाळ्या वाजवू लागले. संगीत शिक्षिका तिचा पियानो बंद करत वळली आणि तिने मला मिठी मारली. मला वाटू लागले की मला ही नोकरी स्वीकारावीच लागेल.

**3** Answer the following questions in **Marathi**, using your own words as far as possible.

**(a)** निवेदकाने शाळेच्या कार्यक्रमाला जाण्याचा निर्णय का घेतला? (परिच्छेद पहिला)

........................................................................................................................ [1]

**(b)** हॉलबाहेर वाट पाहत असताना मुले चांगली का वागली ? **दोन** तपशील द्या. (परिच्छेद पहिला)

1 ........................................................................................................................

2 ........................................................................................................................

[2]

**(c)** पालकांनी हा प्रसंग गांभीर्याने घेतला, हे कशावरून दिसून येते? (परिच्छेद पहिला)

........................................................................................................................ [1]

**(d)** दुसऱ्या परिच्छेदानुसार शाळेचे गाणे गाताना मुलांना कसे वाटले? (परिच्छेद दुसरा)

............................................................................................................................. [1]

**(e)** राष्ट्रगीत गाण्याचा मुलांना अभिमान वाटल्याचे कशावरुन सूचित होते ? **तीन** तपशील द्या. (परिच्छेद दुसरा)

1 .............................................................................................................................

2 .............................................................................................................................

3 .............................................................................................................................
[3]

**(f)** राष्ट्रगीताच्यावेळी संगीत शिक्षिकेने जवळजवळ समस्या कशी निर्माण केली? (परिच्छेद दुसरा)

............................................................................................................................. [1]

**(g)** सभेच्या दरम्यान कोणत्या **दोन** क्रीडा प्रकारांचा उल्लेख आहे? (परिच्छेद तिसरा)

1 .............................................................................................................................

2 .............................................................................................................................
[2]

**(h)** शाळेतील शिक्षकांबद्दल श्री. बिहारी यांचे काय मत होते? (परिच्छेद तिसरा)

............................................................................................................................. [1]

**(i)** मुख्याध्यापकांनी मुलांना काय दिले आणि का? **दोन** तपशील द्या. (परिच्छेद चौथा)

1 .............................................................................................................................

2 .............................................................................................................................
[2]

**(j)** सभेतील लोकांनी श्री. बिहारी यांनी शाळेत येऊन काम करावे अशी त्यांची इच्छा असल्याचे कसे दाखवले? (परिच्छेद पाचवा)

............................................................................................................................. [1]

**(k)** संगीत शिक्षिकेने, श्री. बिहारी आपल्याला आवडले हे कसे दाखवले? (परिच्छेद पाचवा)

............................................................................................................................. [1]

[एकूण: 16]

**4** Look at the text for Question 3. Identify the word or phrase in the text which means the same as the underlined words:

**(a)** मी आलो (परिच्छेद पहिला)

.................................................................................................................................... [1]

**(b)** एक छान गीत (परिच्छेद दुसरा)

.................................................................................................................................... [1]

**(c)** मला अचंबा वाटला. (परिच्छेद तिसरा)

.................................................................................................................................... [1]

**(d)** सर्वांनी माझ्याकडे पाहिले (परिच्छेद पाचवा)

.................................................................................................................................... [1]

[एकूण: 4]

© Cambridge University Press & Assessment 2025

**5** Translate the following passage into **English**.

मी तुम्हाला एका लेखन स्पर्धेबद्दल सांगू इच्छितो त्यामध्ये तुम्ही भाग घेऊ शकता. तुम्हाला तुमच्या आवडीच्या विषयावर फक्त पाचशे शब्दात किंवा त्याहूनही कमी शब्दात एक छोटी गोष्ट लिहावी लागेल. प्रसिद्ध कलाकार टेलिव्हिजनवर सर्वोत्तम कथा वाचतील.
या स्पर्धेसाठी तुम्ही कोणत्या प्रकारची गोष्ट लिहिणार यावर कोणतेही नियम लागू नाहीत - ती गुप्तहेर कथा, भयपट कथा, विनोदी कथा किंवा तुम्हाला आवडणारी कोणतीही गोष्ट असू शकते. मी तुम्हाला फक्त एकच सल्ला देईन: खूप वेगवेगळी पात्रे न ठेवणे चांगले कारण लोकांना कथा समजणे कठीण होऊ शकते.
जर तुम्हाला भाग घ्यायचा असेल, तर कृपया तुमच्या कथा शुक्रवारपर्यंत मला द्या.

Up to 5 marks are available for the content of your answer and up to 5 marks for language.

.......................................................................................................................................................... [10]

BLANK PAGE

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (Cambridge University Press & Assessment) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

Cambridge International Education is the name of our awarding body and a part of Cambridge University Press & Assessment, which is a department of the University of Cambridge.

© Cambridge University Press & Assessment 2025 